रेग्युलर दरखास्त क्र. ०३/२०२६
निशाणी क्र. ०९ खाली

MHAH230000492026

फिरोज मेहबूब पठाण
विरुध्द
आसिफ मेहबूब पठाण

## रेग्युलर दरखास्त क्र. ०३/२०२६ मधील निशाणी क्र. ०९ खालील आदेश

१. धनको यांनी सदरचा अर्ज ऋनको हे त्यांच्या दरखास्त मिळकतीमध्ये बांधकामास अडथळ करीत आहेत त्यामुळे बांधकाम करण्यासाठी पोलीस प्रोटेक्शन देण्यात यावे अशी विनंती केली. सदर अर्जावर निशाणी १४ अन्वये ऋणको यांनी त्यांचे म्हणणे दिलेले आहे. सदरची दरखास्त ही तडजोड हुकुमनामा आधारे झालेली आहे. न्यायालयासमोर वस्तुस्थिती नाही त्यामुळे या न्यायालयास दरखास्त मिळकतीबाबत वस्तुस्थिती येणे आवश्यक आहे त्याकरीता श्रीगोंदा वकील संघातील विधीज्ञ यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुण नुमणुक होणे आवश्यक झालेले आहे त्यामुळे धनको व ऋनको सुचवतील त्या विधीज्ञांना न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमण्यात येत आहे. धनको व ऋनको यांनी संयुक्त नाव सुचवल्याची पुरसीस दिल्यानंतर सदर विधीज्ञ यांना दरखास्तीसोबत दाखल केलेली सर्व कागदपत्रे व दरखास्त प्रत देण्यात यावी व तसे रिट देण्यात यावे. धनको व ऋनको यांनी न्यायालयीन आयुक्त यांची फी समभागात न्यायालयीन आयुक्त यांना जमा करावी. न्यायालयीन आयुक्त यांनी रिट प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसांच्या आतमध्ये ऋनको व धनको यांच्या दरखास्त मिळकतीतील बांधकामाचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करावा.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2026.04.08 17:17:19 +0500

**दिनांक** – ०८.०४.२०२६
**ठिकाण** – श्रीगोंदा

रविंद्र भ. खवले,
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**श्रीगोंदा**